नि.क्र. ९२ लगत                                  रे.मु.नं.७५/२०१७

रामचंद्र वि. शंकर वगैरे

**<u>शपथेवर सरतपासणी वादीतर्फे विधिज्ञ श्री. आर. बी. सावंत यांच्यामार्फत शपथेवर सुरू.</u>**

०१. मी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझे वकीलांनी मला वाचून समजावून सांगितला होता. तो खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र.९२ देण्यात येतो.

०२. पुढे मी अभिलेखावर दस्त ऐवज यादी नि.क्र.९३ खाली माझे मयत वडीलांनी माझे हक्कामध्ये करुन दिलेले अखत्यारपत्र अस्सल प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी, साक्षीदार, नोटरी करणारे यांच्या सह्या असून माझे वडीलांचा अंगठा आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.९४** देण्यात येते.

०३. मी दस्तऐवज यादी नि.क्र.०४ खाली मौजे किल्ला येथील गट क्र.६९३ चा सन २०१६–१७ या वर्षीचा ७/१२ उतारा, साक्षांकीत प्रत दाखल केली आहे, त्यास **नि.क्र.९५** देण्यात येतो. मी प्रतिवादींना खरेदीखत दि.१९/०१/२०११, दस्त क्र.१८५/२०११ ची अस्सल प्रत अभिलेखावर दाखल करण्याकरीता नोटीस दिली होती, त्याप्रमाणे त्यांनी सदर दस्ताची अस्सल प्रत दाखल केली आहे. सदर खरेदीखतास निशाणी देण्यास प्रतिवादींचे विधीज्ञांनी आक्षेप घेतला नाही. सदर दस्त वादींनी आव्हानीत केलेला असल्यामुळे व तो अभिलेखावर अस्सल प्रतीत दाखल असल्यामुळे त्यास **नि.क्र.९६** देण्यात येते.

०४. दस्तऐवज यादी नि.क्र.४ खाली अप्पर जिल्हाधिकारी, रायगड यांनी आर.टी.एस. अपिल क्र.११०/२०१३ मध्ये दि.२५/१०/२०१६ रोजी दिलेल्या आदेशाची साक्षांकीत प्रत दाखल केली आहे, त्यास **नि.क्र.९७** देण्यात येते.

०५. दस्तऐवज यादी नि.क्र.८५ खाली उपविभागीय अधिकारी, माणगांव यांनी आर.टी.एस. पुनर्विलोकन क्र.०४/२०१२ मध्ये दि.०६/११/२०१२ रोजी दिलेल्या आदेशाची साक्षांकीत प्रत दाखल केली आहे, त्यास **नि.क्र.९८** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE   Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE Date: 2024.11.11 16:46:17 +0530

स्थळ : रोहा.            (एस. एस. महाले)

दि.११.११.२०२४            दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रोहा.